प्रा.शंकर आवारे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,ओझर मिग,
ता.निफाड, जि.नाशिक

# पहिल्या महायुध्दाची कारणे

# प्रस्तावना-

पहिले महायुध्द हे अचानक घडलेले महायुद्ध नसून त्यास १७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांती पासून ते १९१४ पर्यंतच्या युरोप मधील अनेक घटना कारणीभूत आहेत. प्रामुखाने नेपोलिअन बोनापार्ट, मॅटरनिक, बिस्मार्क यांच्या इतिहासाचा आपणास अभ्यास करावा लागेल.

पहिले महायुध्द हे २८ जुलै १९१४ ते 11 नोव्हेंबर १९१८ या काळात लढले गेले. या युद्धात जवळ जवळ २८ देशांनी भाग घेतला होता तर अप्रत्यक्षपणे अनेक देश यात ओढले गेले त्यामुळे हे महायुध्द अत्यंत विनाशकारी ठरले. हजारो सैन्य यात मारले गेले तर काही जखमी झाले. संपूर्ण मानवी जिवनात अस्वस्थता निर्माण झाली. या मुळे, जगातील सर्वच देशावर याचे विपरीत परिणाम झाले. म्हणून, त्यास महायुध्द म्हटले गेले. अशा या महायुध्दाच्या महत्वाच्या कारणांचा आढावा आपणास खालीलप्रमाणे घेता येईल.

## ❑ प्रखर राष्ट्रवाद-

जगात आपलाच देश सर्वश्रेष्ठ आहे व त्याच्या विकासासाठी प्रत्येक नागरिकाने सहभाग घेतला पाहिजे, हि भावना या काळात मोठया प्रमाणात निर्माण झाली ते इतर देशांकडे तुच्छतेने पाहू लागले. वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या राष्ट्रवादाच्या संकल्पना निर्माण झाल्याने या प्रखर राष्ट्रवादी भावनेतून महायुध्दास पोषक वातावरण निर्माण झाले.

## ❑ साम्राज्यवाद-

आशिया व आफ्रिका खंडात संपत्ती, नैसर्गिक खनिजे व कच्च्या माल मुबलक प्रमाणात अस्तित्वात असल्याने त्याचा उपयोग आपल्या देशाचा विकास करण्यासाठी व मागासलेल्या राष्ट्रांवर वर्चस्व निर्माण करण्यासाठी इंग्लंड, फ्रान्स, रशिया, पोर्तुगाल, स्पेन, जपान, हॉलंड इ. अनेक देशांमध्ये स्पर्धा सुरु झाल्या. विशेष म्हणजे इटाली व जर्मनी या नवनिर्माण राष्ट्रांनी देखील साम्राज्यवादी धोरणात सहभाग घेतल्याने साहजिकच त्यातून महायुध्द घडून आले.

## ❑ गट विभागणी व गुप्त करार-

१८७० मध्ये बिस्मार्कने फ्रान्सचे आल्सेस व लॉरेन्सचे प्रदेश आपल्या जर्मनीत विलीन केले होते ते प्रदेश घेण्यासाठी फ्रान्स आपल्यावर कधीतरी आक्रमण करेल या भीतीमुळे जर्मनीने १८८२ मध्ये जर्मनी-ऑस्ट्रिया-इटाली यांचा ‘त्रिराष्ट्र संघ’ मित्र करार घडवून आणला व आपल्या राष्ट्राचे रक्षण केले. त्यामुळे याची भीती फ्रान्स व इंग्लंड ला वाटू लागल्याने त्यांनी १९०४ मध्ये मैत्रीचा करार केला व या कारारात १९०७ मध्ये रशिया येऊन मिळाला व त्यांचा ‘त्रिमित्र राष्ट्रसंघ’ तयार झाला. अशा रितीने युरोप मध्ये दोन गटात विभागणी झाली. व त्यांचात महायुध्द घडवून आले.






## ❑ बिस्मार्कची राजनीती-

बिस्मार्कने वेगवेगळ्या राजनीतीचा अवलंब करून जर्मन भाषिक प्रांत एकत्र करून जर्मनी हे नवीन राष्ट्र १८७० मध्ये तयार केले होते. देशास बलाढय करून त्याचे रक्षण करण्यासाठी त्याने फ्रान्सच्या विरोधी ऑस्ट्रिया,डेन्मार्क,इटाली,रशिया इ. राष्ट्रांशी गुप्त पद्धतीने तह-करार केले होते. परंतु १८९० जर्मनीत पहिल्या विल्यम कैसर चा मृत्यू झाल्यानंतर दुसरा विल्यम कैसर सत्तेवर आला. तो महत्त्वाकांक्षी असल्याने बिस्मार्कने आपल्या चान्सेलर पदाचा राजीनामा दिल्याने संपूर्ण युरोप मध्ये संशयाचे व गोंधळाचे वातावरण निर्माण झाले व परीणामी महायुध्याकडे वाटचाल सुरु झाली.

## ❑ विल्यम कैसरची महत्त्वाकांक्षा-

सम्राट विल्यम कैसर दुसरा हा १८९० मध्ये जर्मनीत सत्तेवर आला. तो अत्यंत महत्वाकाक्षी असल्याने तो कोणत्याच बाबत तडजोड करण्यास तयार नव्हता.जगातील सर्वात बलाढ्य व सामर्थ्यशाली आपले राष्ट्र असावे या साठी तो बलाढ्य देशांशी स्पर्धा करू लागला. प्रामुख्याने इंग्लंडच्या बरोबरीने त्याने आपले आरमार उभारले, जास्तीत जास्त सैन्य भारती करू लागला व नवनवीन युद्धसाहित्याचे कारखाने काढण्यास त्याने सुरुवात केली त्याच्या या धोरणामुळे युरोप मध्ये अशांतता निर्माण झाली.

## ❑ बाल्कन प्रश्न / पूर्वीय प्रश्न-

पूर्व युरोपातील बाल्कन प्रश्न हा फार मोठा गुंतागुंतीचा प्रश्न अनेक वर्षापासून तयार झालेला होता. या प्रदेशात सर्बिया, बल्गेरिया, अल्बेनिया, बोन्सिया, रुमानिया, मॉटेनिग्रो अशी लहान लहान राज्ये होती व यावर तुर्की सम्राटाचे राज्य होते तो तेथील असणाऱ्या ख्रिश्चन व स्लाव्ह जनतेवर अन्याय-अत्याचार करीत असल्याने त्याविरुद्ध तेथे आंदोलने होण्यास सुरुवात झाली होती. हा प्रश्न सोडविण्यासाठी ऑस्ट्रिया, रशिया, इंग्लंड, फ्रान्स, इटाली यांनी या प्रांतात हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली बहुतांशी प्रांतावर आपले वर्चस्व असावे यासाठी त्यांचात स्पर्धा सुरु झाली. व त्यातूनच खऱ्या अर्थाने महायुद्धास सुरुवात झाली.

## ❑ आंतरराष्ट्रीय संघटनेचा अभाव-

जगात व युरोपात या काळात अनेक प्रश्न निर्माण झाले होते, लष्करीकरण व साम्राज्यवाद मोठया प्रमाणावर वाढत चाललेला होता, बाल्कन व इतर प्रदेशात मोठया देशांचा हस्तक्षेप वाढत चाललेला होता. तर, पारतंत्र्यात असणाऱ्या देशात अन्याय-अत्याचार वाढत होते. अशा परिस्थितीत न्याय मागण्यासाठी कोणतीच अंतरराष्ट्रीय संघटना अस्तित्वात नसल्यामुळे कोणता देश कुणावर आक्रमण करेल हे सांगता येत नव्हते. एकंदर, सर्वत्र दहशतींचे वातावरण निर्माण झाल्याने परीणामी महायुध्द घडून आले.

## ❑ वर्तमानपत्रे-

वर्तमानपत्रे हे लोकजागृतीचे महत्वाचे साधन आहे. या कालखंडात अनेक राष्ट्रातील वर्तमानपत्रांनी आपल्या देशातील प्रखर राष्ट्रवादास खतपाणी दिले. आपल्या देशाची स्तुती तर इतर देशांबद्दल तिरस्कार ते प्रसारित करू लागले. शत्रू देशातील गुप्त करार, शस्त्रसाठा, युद्धसाहित्य, गुप्त राजनीती इ. बाबत ते प्रसार करू लागल्यामुळे जगात तणाव निर्माण झाला व युध्दास पोषक वातावरण मिळाले.

## ❑ तात्कालिक कारण-

बाल्कन प्रश्नावरून सर्बिया व ऑस्ट्रिया यांच्यात तणाव निर्माण झाला होता व अशा वातावरणात ऑस्ट्रियाचा राजपुत्र आर्चड्यूक फर्डिनंड व त्याची पत्नी सोफिया बोन्सियाची राजधानी सराजेव्हो येथे फिरावयास गेले होते. तेथे त्यांचा २८ जून १९१४ रोजी 'काळा हात' या संघटनेच्या एका माथेफिरूने खून केला. सदर, खून सर्बियाच्या चिथावणीमुळे झाला असल्याने ऑस्ट्रियाने काही मागण्या सर्बियास सादर केल्या. व मागण्या मान्य न केल्यास आक्रमण करण्याची धमकी देण्यात आली. शेवटी २८ जुलै १९१४ रोजी ऑस्ट्रियाने सर्बियावर आक्रमण केले. व पहिल्या महायुध्दास सुरुवात झाली.

## ❑ महायुध्दाची वाटचाल-

१८८२ च्या करारानुसार ऑस्ट्रियास जर्मनीने मदत करून त्यांनी सर्बियावर आक्रमण केले तर सर्बियाच्या मदतीस रशिया व फ्रान्स धावून आले परंतु इटाली सुरुवातीस तटस्थ राहिला. १९१५ च्या लंडनच्या गुप्त तहानुसार मित्र राष्ट्रांनी त्यास काही महत्वाच्या प्रदेशाचे आमिष दाखविल्याने तो मित्र राष्ट्राच्या बाजूने युध्दात उतरला.

जर्मनी महायुध्दात आक्रमक होता. त्याने फ्रान्सवर आक्रमण करून इंग्लंडच्या आरमारावर आक्रमण केले तर जपानने जर्मनीच्या वसाहतींवर आक्रमण केले.अमेरिका सुरुवातीस तटस्थ होता परंतु जर्मनीच्या आक्रमक भूमिकेमुळे १९१७ मध्ये तो मित्र राष्ट्रांच्या बाजूने युध्दात उतरला.

एकंदर इंग्लंड, फ्रान्स, रशिया, सर्बिया, इटाली, बेल्जियम, जपान व अमेरिका एका बाजूला तर ऑस्ट्रिया,जर्मनी,तुर्कस्तान,बल्गेरिया,हंगेरी दुसऱ्या बाजूला अशा दोन गटात महायुध्द घडून आले. त्यात शेवटी १९१८ मध्ये जर्मनी संघाचा पराभव झाला.

---

# समाप्त